# प्रेसनोट

दि.१४/११/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | शेवगांव पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | प्रदीप शंकर महाशिकारे, वय–४६ वर्ष, भुकरमापक, वर्ग–३, भुमी अभिलेख कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ८०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे आजोबा यांचे नावे अमरापूर, ता.शेवगांव शिवारातील शेत गट नं.१८० मध्ये असलेल्या २१ गुंठे जमिनीची भुमी अभिलेख कार्यालय, शेवगांव यांचेकडुन मोजणी करुन घेतली होती. मोजणी नुसार खातेदार यांचे पोट हिस्से करुन हददीच्या खुणा दर्शविण्यात आल्या होत्या, त्याचा सुधारीत नकाशा देण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक प्रदीप शंकर महाशिकारे, वय–४६ वर्ष, भुकरमापक, वर्ग–३, भूमी अभिलेख कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहमदनगर हे रुपये १०,०००/– लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.१४/११/२०२२ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक प्रदीप शंकर महाशिकारे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे रु.१०,०००/– लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु.८०००/– लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१४/११/२०२२ रोजी शेवगांव–ताजनापूर रोडवरील स्मशानभूमी जवळ आयोजित केलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक महाशिकारे याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन रु.८०००/– लाचेची रक्कम स्विकारली असता आरोपी लोकसेवक महाशिकारे यांस रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत शेवगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांकः– ९९३०९९७७००

(दिपक खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर